## रे. दि.मु.५३२/२०२० मधील नि.७२ खालील आदेश

**(निवृत्ती अवघडे वि. शंकर माने व इतर)**

वादीचे मयत वारस यांनी प्रस्तुतचा अर्ज वादी मयत झालेनंतर त्यांचे कायदेशीर व सरळ वारस म्हणून अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरील अर्जाचे व प्रतिवादीने दाखल केलेल्या म्हणण्याचे बारकाईने अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादीचे मयत वारस यांनी अर्जामध्ये कथन केले आहे की, मूळ वादी यांनी सदरचा दावा सरस निरस मानाने वाटपासाठी व जाहीर ठरावासाठी केलेला होता. सदरील दाव्याचे कामकाज चालू असताना त्यातील मूळ वादी निवृत्ती अवघडे दि. २४/१०/२०१९ रोजी कळंबी, ता.खानापूर येथे मयत झालेले आहेत त्यांना प्रस्तुतचे अर्जदारच वारस असून इतर कोणी वारसदार नाहीत. अर्जदारांना अर्ज दाखल करण्यासाठी दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी निघून गेला आहे त्यामुळे वादीचा दावा अबेट झालेला आहे. ते पुढे कथन करतात की, कोरोना काळात मूळ वादीच्या मृत्यूची कागदपत्रे व वारसाची माहिती व त्यांचे पत्ते उपलब्ध नसल्यामुळे तसेच न्यायालयाचे कामकाज बंद असल्यामुळे सदरील अर्ज दाखल करण्यासाठी विलंब झालेला आहे. सदरील विलंब मूळ वादीच्या वारसांतर्फे जाणीवपूर्वक झालेला नसून व कोरोनाच्या प्रादुर्भावाच्या काळात इतर शासकीय कार्यालये मंद गतीने सुरु ठेवली असल्यामुळे झालेला आहे. त्यामुळे सदरचा विलंब झाल्यामुळे झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होवून अर्जदारांना मूळ वादीचे वारस म्हणून अभिलेखावर दाखल करुन घेणे आवश्यक आहे. सबब अर्जदारांनी सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १०, १६ ते १९ यांनी सदरील अर्जावर म्हणणे सादर केले असून तो नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे. त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्ज विलंबाने दाखल झालेला आहे व विलंबाचे कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही असे म्हटले आहे.

४.	अर्जदार यांनी नि.क्र. ६७ कडे मूळ वादी निवृत्ती अवघडे यांच्या मृत्यूचा दाखला अभिलेखावर दाखल केलेला आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यांचे दि. २४/१०/२०१९ रोजी मौजे कळंबी, ता.खानापूर येथे निधन झाल्याचे दिसून येते. मूळ वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींच्या विरुद्ध जाहीर ठराव व दावा मिळकतीचे वाटप होवून मिळण्यासाठी केलेला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर प्रस्तुतच्या अर्जदारांना प्रतिवादींच्या विरुद्ध दावा चालविणेचा अधिकार निर्माण होतो. याकामी अर्जदारांना अभिलेखावर वादी म्हणून दाखल होवून घेण्यासाठी २ वर्षांचा विलंब झालेला आहे. दि. २५/०३/२०२० नंतर देशभरात कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे न्यायालयीन व इतर शासकीय कार्यालयांचे कामकाज मंदगतीने चालू होते त्यामुळे आवश्यकत ती सर्व कागदपत्रे योग्य वेळेत मिळणे दुरापास्त झाले होते त्यामुळे अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केलेली कारणे संयुक्तीक असून अर्ज दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाचे स्पष्टीकरण त्यांनी दिलेले आहे. तसेच दावा चालविण्याचा अधिकार त्यांना प्राप्त होत असून त्यांना याकामी वादी म्हणून शामील करुन घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास अर्जदारांचे अपरीमित असे नुकसान होणार असून भविष्यामध्ये नवीन दावे दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरील सर्व बाबींचा विचार केला असता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१.	अर्ज विनाखर्च मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GAURAV SADASHIV HANGE
Date: 2022.03.14 15:16:59 +0530

**विटा.** **(जी. एस. हांगे)**

**दिनांकः–०७.०३.२०२२** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा.**

**जि. सांगली.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Typist | : | S D Kadam |
| Name of the Court | : | Shri. G. S. Hange,<br>2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Vita. |
| Date of Decision | : | 07/03/2022 |
| Order signed by the P.O on | : | 07/03/2022 |
| Order uploaded on | : | 14/**03/2022** |